14) REGIONAL ECONOMIC COOPERATION IN ASIA || 67
Dr. Mukesh Srivastava & Dr. Shashi Kant Tripathi, Lucknow

15) ग्रामदेवतांच्या यात्रा : संस्कृती जपणूकीचे एक प्रभावी माध्यम || 72
प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे, भूम

16) आनंद यादव यांची कविता : मळ्याची माती || 76
प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे, जालना

17) आदिवासी एवं सामान्य क्षेत्रों के किशोरों में जन्मक्रम. || 78
श्रीमती मनीषा आर्य, बरेली (उ०प्र०)

18) धनगर समाजाचे पारंपारिक व्यवसाय आणि पर्यावरण संतुलन || 82
डॉ. एस. एस. कावळे, चंद्रपूर, पंकज एन. बेंदेवार, गडचिरोली.

19) लोकवाङ्मय - रचना प्रकार बंध || 85
-डॉ. पोपट सिनारे, अहमदनगर

20) गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या अल्पमुदत कृषी कर्ज वसुली..... || 87
डॉ. एस. एन. बुटे, पंकज प्रभाकर नरूले, गडचिरोली.

21) आदिवासी स्वातंत्र्यवीर गुमानसिंग नाईक || 89
डॉ. केशव आत्माराम पावरा, नंदुरबार

22) जीएसटी कायद्यातील नवीन समायाजने– सविस्तर आढावा || 091
प्रा.रिता आर.राऊत, भंडारा.

23) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातून उच्चशिक्षण घेणाऱ्या युवकांचे प्रबोधन || 94
प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील. धुळे & प्रा. यशवंत किसन शिरसाठ, नंदुरबार

24) आदिवासी एवं सामान्य क्षेत्रों के किशोरों में जन्मक्रम के आधार पर..... || 97
श्रीमती मनीषा आर्य,

25) गाँधीजी का सत्य, अहिंसा एवं सत्याग्रह || 100
डा० मनमीत कौर, बरेली (उ०प्र०)

26) उपनिषदों की सांप्रत समय में उपादेयता || 107
डॉ. बी. जी. पटेल, महीसागर (गुजरात)

**15**

# ग्रामदेवतांच्या यात्रा : संस्कृती जपणूकीचे एक प्रभावी माध्यम

प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे
असो. प्रोफेसर,
एस.पी. कॉलेज भूम

************

## प्रस्तावना

आपल्या भारत देश हा खेड्याचा देश असून आजही सुमारे ७० टक्के लोक खेड्यातच राहतात. त्यामुळे भारतात अस्तित्वात असलेली ग्राम संस्कृती ही भारताच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. भारताचा सांस्कृतिक इतिहास हा पुस्तकाच्या पानात नाही, तर लोकांच्या जीवन उत्सवात लिहिला आहे. भारतात जेव्हापासून ग्रामाची निर्मिती झाली तेव्हापासून ग्रामदेवतांची निर्मिती झाली असावी असे म्हटले जाते. पण त्यासंबंधीचा अधिकृत पुरावा कोठेही उपलब्ध नाही. 'ग्रामदेवता' ह्या गावापुरत्या मर्यादित असतात. कारण प्रत्येक गावाची ग्रामदेवता वेगवेगळी असते. तिचे नाव, तिची पूजाअर्चा, विधी, संबंधित देवतेची आख्यायिका व दंतकथा ह्या वेगवेगळ्या असतात. ग्रामीण समाजाची मानसिक गरज यातूनच ग्रामदेवतांची निर्मिती होत असते. एक मानसिक आधार म्हणून अन रोजच्या जीवनाला सुरक्षा प्राप्त व्हावी म्हणून मानवसमूहाने या देवतांची निर्मिती केलेली असावी. हिंदू समाजातील सर्व जाती, धर्मांचे लोक तसेच आदिवासी भागातील लोकही ग्रामदेवताची पूजा–अर्चा करतात. ग्रामदेवता ह्या गावाच्या एका बाजूला किंवा शिवेवर, वेशीवर असतात. अशा ग्रामदेवतांची प्रशस्त मंदिरे असतीलच असे नाही. कधीकधी अशा ग्रामदेवतांचे चौथारे ही असतात. काही ग्रामदेवतांच्या मूर्ती असतात तर काही ग्रामदेवतांच्या मूर्ती ह्या चिकणमातीच्या, पाषाणाच्याकिंवा पाषाणाच्या शिळासारख्या असतात. ग्रामदेवता स्त्री किंवा पुरुष या दोन्ही स्वरूपात आढळतात. उदा. भैरोबा किंवा बहिरोबा, सिदुबा, म्हसोबा, नाथभैरव, ज्योतिबा, दत्तनदेव, गुगाजी, जेजाजी, पाबूजी, चंडोल, खळनाथ या पुरुष ग्रामदेवता आहेत तर एकवीरादेवी, मांढरादेवी, काळूबाई, मरीआई, यल्लमा, सांतेरी, भगवती, दुर्गम्मा, भवानी इ. स्त्रीदेवता होत. प्रत्येक गावात ग्रामदेवता असुन त्या ग्रामदेवताचे जत्रा–यात्रांच्या रूपात कमी अधिक प्रमाणात उत्सव साजरे केले जातात. उत्सव हे ऐक्याचे साधक आहेत. प्रेमाचे बोधक आहेत, स्नेहाचे शोधक तर भावनांचे संवर्धक आहेत. मनामनात प्रेमभावाचे संक्रमण घडविणारे देवदेवतांचे उत्सव जत्रा–यात्रा हा भारतीयांच्या लोकजीवनाचा स्नेह धागा आहे. ग्रामदेवतांच्या यात्रांमध्ये सर्व जाती–धर्मांचे, पंथाचे लोक एकत्र येतात. यात्रांमधून लोकसंस्कृतीच्या अनेकांगांचे दर्शन आपणास घडते. यात्रेमध्ये मोठ्या उत्साहाने सर्व लोक सहभागी होतात. यात्रा ह्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांनी युक्त असल्याने लोकांमध्ये जाणीव जागृती होण्यास मदत होते.

## उद्देश

१. ग्रामदेवतांच्या यात्रांचा अभ्यास करणे.

२. ग्रामदेवतांच्या यात्रांमध्ये विविध कलागुणांचे दर्शन घडते याचा मागोवा घेणे.

३. ग्रामदेवतांच्या यात्रा संस्कृती संवर्धनाचे कार्य करतात याचा अभ्यास करणे.

## गृहितके

१. गावामध्ये ग्रामदेवतांच्या यात्रा भरतात.

२. ग्रामदेवतांच्या यात्रा विविध कला, क्रिडा व लोकजीवन यांना उत्तेजन देतात.

३. ग्रामदेवतांच्या यात्रांमध्ये सांस्कृतिक वारसांचे दर्शन घडते.

## ग्रामदेवतांच्या यात्रांचे स्वरूप

'ग्रामदेवता' हा लोकसंस्कृतिचा एक अविभाज्य घटक असून या ग्रामदेवतांमुळेच लोकसंस्कृतीला वेगळेपण प्राप्त झालेले आहे. खेड्यातील माणूस मोक्ष प्राप्तीसाठी उपासना करीत नाही किंवा नवस बोलत नाही तर लौकिक जीवनाला स्वास्थ व समृध्दी लाभावी यावर भर देत असतो.' त्यामुळे जनमाणसाच्या भावविश्वात ग्रामदेवतांना अपार श्रध्देचे स्थान प्राप्त झालेले आहे. ग्रामदेवतेची सौम्य व उग्र अशी दोन्ही रूपे जनमाणसांत रूजलेली आहेत. ग्रामदेवता जेव्हा कोपते तेव्हा ती उग्र रूप धारण करते. परिणामी कोपलेल्या देवतेचा स्वतः वर, कुटूंबावर तसेच समाजावर वाईट परिणाम होवून तया सर्वांना कोणता ना कोणता त्रास होतो, अशी भावना ग्रामीण जीवनात वैज्ञानिक युगात आपणास पहावयास मिळते. ग्रामीण भागात आजही ग्रामदेवतांच्या यात्रा आवणास भरलेल्या दिसतात. यात्रांचा कालावधी साधारणपणे १, २, ३, ४, ५, ७ किंवा १५ दिवसाचाही असतो. उदा. वेळापूर गावातील श्री. अर्धनारी नटेश्वराची यात्रा तीन दिवस चालते. ग्रामदेवतेची यात्रा प्रामुख्याने वर्षातून एकदाच असते. या यात्रेत नवस केले जातात तसेच केलेले नवस फेडलेही जातात. 'आदीम काळात ग्रामदेवतेला नरबळी देण्याची चाल होती. त्यानंतर ती पशुबळीमध्ये रूपांतरित झाली. त्यातूनच पुढे नरबळीच्या मुंडक्याचे प्रतीक म्हणून पाच नारळांचे तोरण अर्पण केले जावू लागले.'[२] काळानूरूप ग्रामदेतांच्या यात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. यात्राकाळामध्ये ग्रामदेवतांना हळदी, कुंकू, गंडदोर, खणनारळ, फुले, फळे, अन्नधान्याचे विविध पदार्थ, भाजीपाला, दही–दुध असे पदार्थ वाहिले जातात. ग्रामदेवतांच्या पूजा–अर्चा, नवस बोलणे व फेडणे, अभिषेक करणे, पानपूजा बांधणे, उपवास करणे, दंडवत घालणे, सुवासिनी जेवू घालणे यासारखे विधी यात्राकाळात पार पडतात. याशिवाय या काळात रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, गुरूचरित्र, एकनाथी भागवत यासारख्या ग्रंथाचे वाचन केले जाते. तसेच भजन, कीर्तन केले जाते. यात्रा काळात खेळणी, भांडी, मिठाई, रसवंती, ज्यूसबार, फळाची, अलंकारांची तसेच प्रसाद भांडार, विविध प्रकारचे स्टॉल, रहाट पाळणे, मौत का कुआ, प्राण्यांचे विविध खेळ, हॉटेल, चित्रपटांच्या टुरिंग टॉकीज, तमाशाचे तसेच ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम, बैलगाडी तसेच घोडागाडी शर्यत, कुस्तीस्पर्धा, पालखी मिरवणुकीतील लेझीम बॅण्ड आदी वाद्यवृंद, शोभेच्या रंगी बेरंगी दारूची आतषबाजी, महाप्रसाद आदी कार्यक्रमांची रेलचेल असते.'[३] अनेक यात्रांमध्ये लावणी, तमाशा, नाटक यांसारख्या मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. याचबरोबर यात्रांमध्ये कबड्डी, आट्या–पाट्या, कुस्ती, खो–खो यासारख्या खेळांचे तसेच व्यक्तिमत्व विकास स्पर्धाचे आयोजन करून बक्षीसे दिली जातात. अनेक यात्रांमध्ये घोडागाडी, बैलगाडी, गाढव तसेच कुत्र्याच्याही शर्यती घेतल्या जातात. आधुनिक काळात यात्रामध्ये बराचसा बदल झालेला असूनयात्रांमध्ये कृषिप्रदर्शन, विज्ञानप्रदर्शन यांसारख्या घटकांचाही समावेश केला जात आहे. उदा. अकलूज येथे महाशिवरात्रीला भरणाऱ्या यात्रेमध्ये कृषी व कृषीपुरक वस्तूंचे प्रदर्शन भरविले जाते.

**यात्रा : संस्कृती संवर्धनाचे माध्यम**

प्रत्येक गावामध्ये ग्रामदेवतांच्या त्या यात्रांमध्ये विविध जाती जमाती, धर्म व पंथाचे लोक सहभागी होत असतात. यात्रेमध्ये जे वेगवेगळ्या प्रकारचे विधी असतात त्या प्रत्येक विधीचा मान वेगवेगळ्या जातीच्या लोकांकडे असतो. त्यामुळे वेगवेगळ्या जाती, धर्म, पंथाचे लोक एकत्र येतात. त्यांच्यांत आचार–विचाराचे, आदान–प्रदान होते, परिणामी या सर्वांमध्ये राष्ट्रीय **ऐक्य, सर्वधर्मसमभाव तसेच राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण** होण्यास मदत होते. ग्रामदेवतांच्या यात्रा काळात देवदेवतांचे अवतारकार्य व त्यांचे माहात्म्य वर्णन करणारे विविध प्रकारच्या अध्यात्मिक ग्रंथांचे वाचन केले जाते. शिवाय भजन–किर्तन, प्रवचने तसेच विविध कथा सादर केल्या जातात. अशा प्रकारच्या कार्यक्रमामुळे

'लोकांचे मनोरंजन, लोकशिक्षण व प्रबोधन होते. धार्मिक ग्रंथपठणाने अनेकांना मानसिक, आत्मिक शांती, मन:शुध्दी लाभते. मानवाच्या सामाजिक जीवनाचा विकास होतो.'[४] ग्रामदेवता विषयी तसेच त्यांच्या यात्रांविषयी अनेक आख्यायिका, दंतकथा, लोककथा प्रचलित असतात. 'सामाजिक, सांस्कृतिक विशेष तत्कालीन समाजाच्या रूढी, परंपरा, दैवत विषयक समजुती जाणून घेण्यासाठी आख्यायिका उपयोगी ठरतात.'[५] ग्रामदेवताच्या यात्रांमध्ये सांस्कृतिक अभिव्यक्ती ही देखावे, मेळे, सोंगे, वगनाट्य, नाटक, लावणी, तमाशाचे फड, ऑकेस्ट्रा, नृत्य, पथनाट्य अशा विविध लोककलांच्या माध्यमातून प्रकट होत असे. या संदर्भात नवनाथ शिंदे म्हणतात,'आदिशक्तीच्या लोकोत्सवातून तत्कालीन आणि मध्यकालीन लोकमानस, लोकसंस्कृती, भाषा यांची अभिव्यक्ती होताना दिसते.'[६] ग्रामदेवतांच्या यात्रामध्ये विशेषत: ग्रामीण भागामध्ये गोंधळ, जागरण, भारूडे, बहुरूपी, पोतराज, आराधी, वाघ्या—मुरळी इत्यादी पारंपारीक लोककला आपणास पहावयास मिळतात. या बाबतीत रामचंद्र देखणे म्हणतात, 'नृत्य, नाट्य, संवाद, निरूपण, लोकगीते, लोकभूमिका यांची जोड मिळालेला एक मराठमोळा लोकरंग म्हणजे गोंधळ. मनोरंजनाइतकेच प्रबोधनाचे मूल्य असणाऱ्या 'गोंधळ' या लोककलेचे आणि परंपरेचे मोठेपण ओळखून मराठी संतानीही गोंधळाला भारूडात स्थान दिले आहे. म्हणून 'गोंधळ' या लोककला प्रकाराचे शरीर जरी मनोरंजनाचे असले तरी 'आत्मा' हा प्रबोधनाचा आहे.'[७] ग्रामदेवतांच्या यात्रा लोकांच्या कलात्मक प्रेरणांना गती देतात. खेळणी, कलावस्तू, भांडी, लाकडी व मातीच्या वस्तू यांची खरेदी—विक्री यात्रेत होत असते. परिणामी अशा वस्तूच्या निर्मितीच्या हस्तकलांचे अविष्कार घडत असते. पारंपारीक लोककलांचा अनमोल ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीच्या हाती दिला जातो व तो अनुपम आणि मौलिक असतो. याचा प्रत्यय ग्रामदेवतांच्या यात्रा काळात येत असतो. याविषयी रा.चिं. ढेरे यांनी वासुदेव, गोंधळी, भुत्या, वाघ्या—मुरळी, भराडी, पोतराज, जोगती, जोगतीण या लोकसंस्कृतिक संस्थाचा परिचय करून देवून त्यांच लोकसंस्कृतीच्या घडणीत महत्त्वाचा वाटा आहे असे म्हटले आहे.'[८] यात्रांमध्ये पारंपारिक व देशी खेळाच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. कुस्ती, खो—खो, आट्या—पाट्या, कबड्डी, क्रिकेट, यासारख्या विविध खेळाच्या स्पर्धाचे आयोजन केल्याने क्रिडाविकास होण्यास ग्रामदेवतांच्या यात्रांची मदत होत आहे. त्यामुळे उत्कृष्ट खेळाडू घडत आहेत. तसेच रांगोळी, वक्तृत्व, निबंध, हस्ताक्षर, विविध विषयांवरील, प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन यात्रांमध्ये केले जात असल्याने मानवाच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळत आहे. अलिकडील काळात शेती आणि शेताशी संबंधित विविध वस्तूंचे प्रदर्शन भरविले जात असल्याने शेती व शेतीपुरक व्यवसाय यांच्या विकासास चालना मिळण्यास मदत होत आहे. यात्रांमध्ये बैलगाडी, घोडागाडी, गाढव व कुत्र्यांच्या शर्यती तसेच पशुप्रदर्शन याचे आयोजन केले जात असल्याने प्राण्यांविषयी प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, जाणीवजागृती व आस्था निर्माण होत आहे. तसेच यात्रामध्ये स्वच्छता, शौचालय, जल संवर्धन, भूसंवर्धन, वृक्षसंवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धन प्राणी व पक्षी संवर्धन, लेक वाचवा लेक शिकवा, यासारख्या विविध अभियानाविषयीचे प्रबोधन व प्रसार करणे सहज शक्य झाले आहे. यात्रांमध्ये अंध श्रध्दा, जुने रितीरिवाज, चालीरिती, रूढी, परंपरा, प्रथा याविषयीची जनजागृती करून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यास मोठ्या प्रमाणात वाव असतो. अशा प्रकारे ग्रामदेवतांच्या भरत असलेल्या यात्रा ह्या संस्कृती संवर्धनाचे दयोतक आहेत.

**समारोप**

मोक्ष प्राप्ती पेक्षा सर्वसामान्य मनुष्याच्या जीवनात स्वास्थ व समृध्दती येणे हाच उद्देश ग्रामदेवतांच्या यात्रांचा असतो. लोक संस्कृतीचा प्रवाह ग्रामदेवतांच्या

यांत्रांच्या माध्यमातूनच भक्कम झालेला असून त्या बहुसांस्कृतिक लोकजीवनाचे दर्शन घडवितात. ग्रामदेवताच्या यात्रामधील सांस्कृतिक जीवन विविध मूल्यांवर आधारित असून ते लोक संस्कृतीच्या अनेकांगाचे प्रदर्शन घडवित असतात. ग्रामदेवतांच्या यात्रा जिवंत अशा सांस्कृतिक नवचैतन्याचा अविष्कार तसेच मूल्यप्रेरणांचे प्रतिबिंब घडवितात. त्यामुळेच ग्रामदेवतांच्या यात्रामधील प्रकट होणारी भारतीय संस्कश्ती ही अस्सल, ग्रामीण व देशी असून ती मातीशी नाते सांगणारी आहे. ग्रामदेवतांच्या यात्रा सांस्कृतिक जीवनातील समृध्द परंपरांचे दर्शन घडवितात. त्यांच्यामध्ये अभिष्यक्त होणारे भावविश्व मानवतेवर आधारित आहे. जे वाईट आहे त्याचा त्याग करून जे चांगले आहे ते टिकवून ठेवण्याचा प्रयत्न ग्रामदेवतांच्या यात्रांनी केला आहे. शिवाय नवीन मूल्ये रूजवून जुन्या मुल्यांचे जतन व संवर्धन करून ग्रामदेवतांच्या यात्रांनी मानवतेला स्वातंत्र्य, समता, बंधुता, अखंडता, एकात्मता, सर्वधर्मसमभाव, स्त्री—पुरूष समानता अशा विविध मुल्यांची जोड दिली आहे.

### संदर्भ


१. भोसले द. ता. — लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा, पदमगंधा प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती— २०जून २०१३, पृ.क्र. २०

२. भोसले द.ता.— लोकसंस्कृती : स्वरूप आणि विशेष, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती— २७ मे २००४, पृ.क्र. १८

३. शिंदे नवनाथ अंगद — उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकदेवते, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती— ऑक्टोबर २०१५, पृ.क्र.१८

४. कित्ता, पृ.क्र. ८७

५. कित्ता पृ.क्र. १४०

६. कित्ता पृ.क्र. ८८

७. देखणे रामचंद्र— गोंधळकृ परंपरा आणि अविष्कार, पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००५ पृ.क्र.४

८. ढेरे रा.चि.— लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण २१ जुलै २०१५ पृ.क्र.४


❑❑❑



S.P.Mahavidyalaya, Bhoom BHOOM Dist. Osmanabad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya Bhoom
Dist.Osmanabad